# डॉ.एच.एन.सिन्हा महाविद्यालय, पातुर
## २०२०-२१
## मराठी विभाग
## वर्ग B.A.(II) (मराठी)

**मृद्ग्रंथ भाग- ०२**
**अध्यक्ष- डॉ.गजानन जाधव**

**संपादक मंडळ**

डॉ. मनोज तायडे,डॉ.केशव फाले, डॉ.काशिनाथ बऱ्हाटे,
डॉ.राजेंद्र हावरे,डॉ.अशोक कांबळे, डॉ.संतोष चव्हाण

**प्रकाशक**
राघव पब्लिशर्स अँन्ड डीस्ट्रीब्युटर्स
राजविकास टॉकिज जवळ
महाल नागपूर-३२
शाखा – जबलपूर

## कवी परिचय-अखेर कमाई

**कुसुमाग्रज(१९१२-१९९९)**

कुसुमाग्रज उपाख्य विष्णू वामन शिरवाडकर हे कवी लेखक, नाटककार व समीक्षक म्हणून परिचित आहेत. ज्ञानपीठ पुरस्कार मिळवणाऱ्या कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा केला जातो.त्यांचे विशाखा,समिधा, मुक्तायन,'प्रवासी पक्षी' आदी काव्यसंग्रह तसेच दूरचे दिवे, ययाती आणि देवयानी नटसम्राट इत्यादी नाटक प्रसिद्ध आहेत.'जान्हवी, कल्पनेच्या तीरावार' या यांच्या कादंबऱ्याही प्रसिद्ध आहेत.१९६४ अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून त्यांना बहुमान मिळाला.

'प्रवासी पक्षी' या काव्यसंग्रहातील प्रस्तुत कवितेत कवीने समाजातील दांभिकतेवर कोरडे ओढले आहेत.

## अखेर कमाई – कुसुमाग्रज

मध्यरात्र उलटल्यावर
शहरातील पाच पुतळे
एका चौथऱ्यावर बसले
आणी टीप गाळू लागले
जोतीबा म्हणाले
शेवटी मी झालो
फक्त माळ्यांचा

शिवाजीराजे म्हणाले
मी फक्त मराठ्यांचा
आंबेडकर म्हणाले
मी फक्त बोधांचा

टिळक उद्गारले
मीतर फक्त
चित्पावन ब्राम्हणांचा
गांधीनी गळ्यातला गहिंवर आवरला
आणि ते म्हणाले
तरी तुम्ही भाग्यावान,
एकेक जात-जामात तरी तुमच्या पाठीशी आहे.
माझ्या पाठीशी मात्र
फक्त सरकारी कचेऱ्यातील भिंती

## कवितेचा आशय –

‘ अखेर कमाई’ हा कविता कुसुमाग्रजांच्या ‘ प्रवासी पक्षी’ या काव्यसंग्रहातील असून ही कविता फॅण्टसी प्रकारात मोडणारी आहे. समाज मनातील दांभिकतेवर कोरडे ओढणारी ही कविता अस्वस्थ व अंतर्मुख करणारी आहे.

मध्यरात्र उलटल्यावर शहरातील पाच पुतळे एकत्र जमा झाले आणि एका चौथऱ्यावर बसले. हे पाचही पुतळे भारतातील महापुरुषांचे होते.सर्व महापुरुषांचे पुतळे डोळ्यातून अश्रू गाळू लागले.

काही वेळानंतर महात्मा फुले म्हणाले शेवटी मी झालो फक्त माळ्यांचा म.फुले यांनी सर्व समाजासाठी कार्य केले पण त्यांना लोकांनी जातीमध्येच बांधून टाकले.

शिवाजी महाराज म्हणाले, मी फक्त मराठ्यांचा, माझी जयंती पुण्यतिथी फक्त जाती पुरती उरली आहे.शिवाजी महाराज फक्त मराठ्यांपुरतेच उरले लोकांनी त्यांना आपल्या जातीत बांधून टाकले डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले मी फक्त बौद्धांचा देशातील सर्वसामान्य कष्टकरी पीडित जणांसाठी, स्त्रियांसाठी डॉ.आंबेडकरानी कार्य केले पण त्यानाही लोकांनी जातीबद्ध करून टाकले.

नंतर लोकमान्य टिळकांनीही आपले दुख व्यक्त केले ते म्हणाले कि मी फक्त चित्पावन ब्राम्हणाचा देशाच्या स्वातंत्र्यासाठी आटोकार प्रयत्न करणाऱ्या टिळकांना समाजाने ब्राम्हण जातीतील एक गटात बंदीस्त केले या चारही पुतळ्यांना जातीचे शिक्के मारले गेल्यामुळे अतीव दुख होते.

शेवटी पाचवा पुतळा महात्मा गांधीजींचा त्यांनी आपला गळ्यातला गहिवर आवरला आणि ते चारही पुतळ्यांना म्हणाले, “तरी तुम्ही भाग्यवान ” गांधीजी आपले दुख प्रगट करतांना म्हणतात तुम्ही तरीही भाग्यवान आहेत कारण तुमच्या पाठीशी एकेक नातजमात तरी आहे. माझ्या पाठीशी फक्त सरकारी कचेऱ्यातील भिंती तेवढ्या आहेत. सत्य, अहिंसा या त्यांच्या तत्वांना समाज विसरून जातो. सरकारी कार्यालयात फक्त त्यांचा फोटो लावला जातो.

## समारोप :-

देश पारतंत्र्यात असतांना जात धर्म विसरून देशभक्तांनी, समाजसुधारकांनी एकोप्याने स्वातंत्र्यासाठी व समाज सुधारणे साठी प्रयत्न केलेत.आपल्या देशातील जातीभेद विकोपाला गेला होता. तेव्हा तो नष्ट करण्यासाठी अनके थोर नेते झगडले त्यासाठी त्यांनी आपले प्राण पणाला लावले

परंतु आता जाती-जमातींनी त्यांचावरच आपली मालकी प्रस्थापित केली त्यांना जाती मध्ये वाटून टाकले. अशावेळी त्यांना काय वाटत असेल हे पुतळ्यांच्या माध्यमातुन कुसुमाग्रजांनी अतिशय सुंदर रीतीने लिहिलेले आहे.

## ॥ धन्यवाद ॥

सादरकर्ते: प्रा. सारिका पाचराऊत
मराठी विभाग
डॉ.एच.एन.सिन्हा महाविद्‌यालय, पातुर